M :- 24787

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ..६०..ठ. क्र......११४ दि..२९.।६।१९८....रोजी ठेवता सालोल प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

८०

केंद्र शासनाच्या नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीसाठी ५% निधी राखीव ठेवण्याबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मा. शासन निर्णयानुसार केंद्र शासनाच्या नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात दिव्यांग व्यक्तीसाठी ५% निधी राखीव ठेवणेबाबत मा. मनपा सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १९-५-२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

याबाबत यापूर्वीच निर्णय झालेला असल्याने सन २०१८-१९ चे बजेटमध्ये तरतूद करणेत आलेले आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/नियमित सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ८१ ठ. क्र. ११५ दि. ३१/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सन २०१६-१७ चे हिशोब व शिल्लक रक्कमांचे नुतनीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सन २०१६-१७ चे हिशोब व शिल्लक रक्कमांचे नुतनीकरण करणेच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची मान्यता दिलेली असल्याचे मानणेत येईल आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्तांकडून महानगरपालिकेला पाठविणेत येईल अशी तरतूद असल्याने हा अहवाल मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दि. १९-५-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 62 ठ. क्र. 116 दि. 30/4/18 रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत सोलापूर शहर मलनिःत्सारण व्यवस्था सुधारणे या मंजूर शासकीय योजनेचे मलवितरिका (ड्रेनेज लाईन) घालणे कामाचे मंजूर मक्तेदार दास ऑफशोअर इंजि. प्रा.लि. मुंबई यांना सो.म.पा.चे मालकीचे जुळे सोलापूर पाण्याच्या टाकीच्या परिसरातील जागा ऑफिस करिता तात्पुरते मोबाईल कंटेनर व मटेरिअल स्टोअर करणेकरिता वापरात असलेली ९४५.४० चौ. मी. खुली जागा  मा. सहा. संचालक नगर रचना यांनी दिलेल्या सन २०१४ पासून शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासकी शिघ्रसिध्दगणकामधील ज्या त्या वर्षामधील प्रति चौ.मी. दराने होणा-या प्रति माह भाडयाच्या दराने व मा. अधिक्षक भूमी व मालमत्ता, सो.म.पा. यांनी दिलेल्या मा. शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयानुसार ज्या त्या कालावधीकरिता नेमून दिलेल्या सेवा कर (Service Tax) अथवा वस्तु व सेवा कर (G.S.T.) या दराने दि. १-८-२०१४ पासून ते योजना पूर्ण होईपर्यंतचे कालावधीकरिता भाडयाने देणेस, मक्तेदारासमवेत योग्य त्या स्टॅम्पवर भाडे करार करुन घेणेस यापूर्वी मा. आयुक्त यांचे मान्यतेने मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ब) नुसार मा. स्थायी समितीकडे सक्षम मान्यतेस्तव सादर केलेले प्रकरण मा. स्थायी समितीकडे माहे नोव्हेंबर २०१६ कार्यपत्रिका क्रमांक ३१, दिनांक ५-११-२०१६ रोजीचे सभेत विषय क्रमांक ६११ वर दाखल करुन मा. स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक ६३७ दि. ७-११-२०१६ अन्वये तूर्त तहकूब असा निर्णय घेतलेला आहे. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार सदर प्रकरणी दि. १६-३-२०१८ ने मा. आयुक्त यांची मानीव मान्यता घेतलेली असून, मा. आयुक्त यांचे दि. १६-३-२०१८ चे टिपणीप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती मा. सर्वसाधारण सभेसमोर माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १६-३-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नियमित/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३ ठ. क्र. ११८ दि. २७/६/१८ रोजी ठेवला असता खालील प्रमाणे ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सोलापूर शहर हद्दवाढ भागात ड्रेनेज व्यवस्था करणे व मर्लानत्सारण केंद्रे बांधणेचे काम दास ऑफ शोअर कंपनी व एच एन भट कंपनी यांचे तर्फे चालू असून त्या अंतर्गत जुळे सोलापूर भागात ड्रेनेज व्यवस्था करणे व त्यासाठी सोरेगांव हद्दीत पाझर तलावाच्या खाली मलनित्सारण केंद्र बांधण्याचे काम सन २०१५ पासून प्रगतीपथावर आहे. गेल्या वर्षी म्हणजे सन २०१७ च्या पावसाळयात सोलापूर जिल्हयात सर्वच ठिकाणी भरपूर पाऊस पडलेला आहे. जून २०१७ च्या पहिल्या दोन आठवडयात सोलापूर शहर व परिसरात खूप मोठया प्रमाणात पाऊस पडला होता. दि. ०८/०६/२०१७ ते ११-०६-२०१७ या चार दिवसात खूपच जास्त पाऊस पडला त्यावेळी जुळे सोलापूर भागातील पावसाचे सर्व पाणी जमिनीवरुन तसेच जुळे सोलापूर भागात नव्यानेच टाकलेल्या ड्रेनेज लाईनच्या प्रॉपर्टी कनेक्शन मधून मेन ड्रेनेज मॅनहोल चेंबरमध्ये येवून एकत्रितरित्या मुख्य ड्रेनेज लाईन मधून सोरेगांव येथील प्रतापनगर येथे नव्यानेच बांधण्यात आलेल्या मलशुध्दीकरण केंद्राच्या (STP) कलेक्टींग वेल, एस.बी.आर. बेसिन येथे जमा होवून त्यातून ओव्हर प्लो होवून एसटीपीच्या लगत असलेल्या शेतक-यांच्या शेतात व विहीरीत साचून व शेतीचे बांध फोडून पुढे जात राहिले होते. त्यामुळे प्रतापनगर येथील शेतकरी श्री. रामचंद्र उर्फ कल्लप्पा धनाजी पवार यांनी त्यांचे शेतीचे ड्रेनेजच्या पाण्यामुळे नुकसान झाले म्हणून नुकसान भरपाई मिळणेबाबत महानगरपालिकेकडे विनंती अर्ज सादर केले आहे. तसेच मा. तहसीलदार उत्तर सोलापूर यांनी देखील सदर शेकतक-याला योग्य ती नुकसान भरपाई देण्याबाबत मनपास कळविले आहे. त्यानुसार सदर शेतक-यास र.रु. १,६८,४५०/- एवढी रक्कम नुकसान भरपाई देणेबाबत त्यानुसार शेतकरी श्री. रामचंद्र उर्फ कल्लप्पा धनाजी पवार यांना नुकसान भरपाई म्हणून र.रु. १,६८,४५०/- इतकी रक्कम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (राज्यस्तर) अंतर्गत सोलापूर शहर व हद्दवाढ भागात ड्रेनेज लाईन टाकणे व मलशुध्दीकरण केंद्रे बांधणे या योजनेच्या कॉन्टेनजन्सीतून खर्ची टाकण्यास व अदा बिल करुन शेतक-यास देण्यास मा. आयुक्त यांचे दिनांक २७-४-२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

याकामी जबाबदार असलेल्या मक्तेदाराकडून संबंधितास नुकसान भरपाई देणेकामी कार्यवाही ठेवणेस मान्यता देणत येत आहे.

(सही)

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.८४ ठ. क्र.....९९६
दि.३१/०७/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्या आधारे महानगरपालिका सेवांची ३ सेवेत विभागणी करुन ३८ अधिका-यांच्या पदांसाठी तसेच आस्थापनेवरील उर्वरीत पदांचा आकृतीबंध निश्चित करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे महानगरपालिकांच्या वर्गीकरणाद्वारे मुंबई महानगरपालिका वगळून अन्य २४ महानगरपालिकांच्या आस्थापनेवरील सेवांची परिशिष्ट-१ प्रमाणे (१) प्रशासकीय सेवा (२) लेखा सेवा (३) तांत्रिक सेवा या तीन भागात विभागणी करण्यांत आली आहे. परिशिष्ट-२ प्रमाणे महानगरपालिकेच्या सेवेतील ३८ संवर्गातील पदांचे पदनाम, पदसंख्या, व वेतनश्रेणी यांचा आकृतीबंध (Staffing Pattern) निश्चितीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५, ४६, ४७, ५१, ५३, ५४ व ३४६ ते ३४८ अन्वये प्राप्त अधिकाराअंतर्गत शासनाने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयानुसार महानगरपालिका सेवांची ३ सेवेत विभागणी करुन ३८ अधिका-यांच्या पदासाठी तसेच उर्वरीत मनपाकडील अधिकारी/कर्मचा-यांच्या पदांसाठी एकत्रित तयार करणेत आलेला आकृतीबंधास मा. महानगरपालिकेची मंजूरी मिळणेस्तव तसेच महानगरपालिका सेवांची ३ सेवांची विभागणी करुन ३८ अधिका-यांच्या पदांसाठी तसेच आस्थापनेवरील उर्वरीत पदांचा आकृतीबंधास मा.मनपाच्या मान्यतेअंती शासनाकडे सदरचा आकृतीबंधास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) नुसार मान्यता मिळणेस्तव मा. सर्वसाधारण सभेकडे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. २४-५-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव हा ३८ अधिका-यांच्या पदांसाठी तसेच आस्थापनेवरील उर्वरीत पदांचा आकृतीबंध निश्चित करणेबाबत आलेले असून त्यामध्ये पदनाम व वेतनश्रेणी नमूद करणेत आलेले आहे. या प्रस्तावामध्ये संबंधित अधिका-यांची कार्यसूची नमूद करणेत आलेली नव्हती ती पुरवणी टिपणीने मा. आयुक्त यांनी सादर केलेली आहे. सबब कार्यसूचीसह मा. आयुक्त यांचे दि. २४/५/१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मुलतवी/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज..८५ ठ. क्र......११९ दि.३१/८/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव एकमताने/सर्वानुमते पास झाला.



महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सुविधांचा विकास करणेसाठी विशेष अर्थसहाय्य सन २०१७-१८ या योजने अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ क्षेत्रातील नागरी सोयी सुविधांचा विकास कामे करणे कामी एकूण खर्चाच्या ८०% हिस्सा र.रु. १३.९२ कोटी राज्य शासनाचा व २०% हिस्सा र.रु.३.४८ कोटी सोलापूर महानगरपालिकेचा राहणार आहे. असे एकूण र.रु.१७.४० कोटी इतके उपलब्ध होणार असल्याने कामासमोर सुचविणेत आलेल्या रक्कमेनुसार र.रु.१७.४० कोटी इतक्या रक्कमेची कामे निश्चित करणेकरिता व सदर कामाचे प्राधान्यक्रम ठरविणेकरीता व सदर कामे करणेच्या अनुषंगाने मा.शासनाच्या निर्णयानुसार म.न.पा. चा २०% हिस्सा र.रु.३,४८,११,९९८/- इतके सोलापूर महानगरपालिका भरण्यास सहमती देत आहे. अशा प्रकारचा ठराव पारित करणेस मा आयुक्त यांचे दि.२६-०५-२०१८ टिपणी प्रमाणे आलेले प्रकरण व उपरोक्त योजनेमधून र.रु. १७.४० कोटीची कामे निश्चित करणे करिता व सदर कामाचे प्राधान्यक्रम ठरविणेकरिता मा. नगरसचिव यांचेकडे प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. ३ दि. ३०-५-२०१८ अन्वये सादर करणेत आलेल्या प्रस्तावात उपरोक्त नमूद नुसार मा. मंत्री महोदय व मा. सदस्य यांनी सुचविलेल्या कामाची यादी मूळ यादीत समाविष्ठ करणेस पुरवणी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २६-५-२०१८ व दि. १५-६-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

हद्दवाढ भागात नागरी सोयी सुविधा विकास विशेष अर्थसहाय्य र.रुपये १७.४० कोटीमधून खाली नमूद केलेल्या तक्त्यामधील कामे प्राधान्यक्रमाने करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | पूर्वगणनपत्रक र.रु. (लाखात) |
|---|---|---|
| १. | जवाहर नगर टाकी ते पिंकी बिअर शॉपी पर्यंत १८ इंची पाईप लाईन घालणे | ४७,०४,९६० |
| २. | डॉ. दिड्डीमनी दवाखाना ते चाकोते नगर, ब्रम्हनाथ नगर पर्यंत १२ इंची पाईप लाईन घालणे | १९,०३,१७६ |
| ३. | माकम घर ते सरवदे नगर पर्यंत १२ इंची पाईप लाईन घालणे | २२,७३,२३८ |
| ४. | मिठ्ठाबाई घर ते मोमीन नगर पर्यंत १२ इंची पाईप लाईन घालणे | १३,२१,६५० |
| ५. | ऐश्वर्या बिअर शॉपी ते संगम नगर पर्यंत १० इंची पाईप लाईन घालणे व कोटानगर व एच ग्रुपमध्ये ६ इंची पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन घालणे | १३,९२,६०० |
| ६. | अक्कलकोट रोड, कल्पना नगर पिण्याच्या पाण्याची लाईन घालणे | २५,००,००० |
| ७. | अक्कलकोट रोड व्यंकटेश नगर ते नागनाथ सोसायटी पर्यंत ८ इंची पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन घालणे | २०,००,००० |
| ८. | अरफत नगर, शिवलिंग नगर, माळी नगर, सिध्दरामेश्वर नगर, नितीन नगर, सुनिल नगर व मल्लीकार्जून नगर व अविनाश नगर येथे पाण्याची पाईप लाईन घालणे. | २५,००,००० |
| ९. | सुनिल नगर, समरा नगर, आशा नगर कामगार वसाहत व संगमेश्वर नगर विलविहार नगरभाग येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन घालणे | ३३,००,००० |
| १०. | प्र.क्र. ११ समाधान नगर वंडरलॅन्ड सिटी ते किसान नगर (बसवेश्वर बोळ) पर्यंत पिण्याची पाईप लाईन घालणे | ३२,००,००० |

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ. ८…६…ठ. नं. १२०
दि. ३१/५/१८…रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

८६

दि.३१/०५/२०१८ पासून सोलापूर शहराचा पाणी पुरवठा चार दिवसाआड करणेकामी करणेत येणा-या कार्यवाही बाबतचा अहवाल मा.सर्वसाधारण सभेपुढे कार्योत्तर माहितीस्तव ठेवणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२९/०५/२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सहमूल/अग्रमूली/... सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. [illegible] ठ. क्र. ...927 दि. [illegible] ....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



टँकरद्वारे पाणीपुरवठा केलेल्या बिलामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबत चौकशी करुन कार्यवाही करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावामध्ये सविस्तर माहिती दिली असून दिनांक २५-५-२०१८ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेमध्ये मा. सदस्यांनी लक्षवेधी प्रश्नाद्वारे उपस्थित केलेल्या विभागीय कार्यालय क्र. २ कडील टँकरच्या बिलाबाबत अहवाल सादर करणेबाबत मा. महापौर यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त नमूदप्रमाणे प्राथमिक अहवाल सादर करणेत येत आहे. सदरचा प्राथमिक अहवाल मा. महापौर यांचे आदेशाप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ११-६-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ ची सखोल चौकशी करुन संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

[signature]

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/साधारण/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.८८ ठ. क्र.....922 दि..31/10/18.. रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव एकमताने/बहुमताने पास झाला.

८८

संभाजी तलाव परिसरात राणी लक्ष्मीबाई पुतळा बागेतील सार्व. शौचालय येथे सार्वजनिक शौचालयास बायोडायजेस्टर बसविणेकामी पुरवठाधारकाकडून युनिट मागविणेकामी, निविदे प्रक्रियेची अट शिथील होणेकामी सदरचे कामी येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा. अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महापालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ६-६-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(सही) P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ८९ ठ. क्र....123
दि.:31/5/18 रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
एकमताने/बहुमताने पास झाला.

केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालय नवी दिल्ली यांची पिडीत ग्रस्त महिलाकरीता टी.पी.२ फा.प्लॉ.नं.७८ रुपाभवानी मंदीरा जवळ One Stop Center इमारत बांधणे करिता बाबत सविस्तर डीपीआर व पुर्वगणनपत्रक तयार करणेत आलेले असून त्यास मंजूरी मिळून सदरचे प्रकरण मा. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचे कडेस सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि.१६-०६-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

Sd/- P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नियमीत/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ ..६०.७. व.......124 दि.३१/८/१८.. रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महापालिकेच्या विविध खात्याकरिता संगणक व इतर अनुषंगिक साहित्य खरेदीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून प्रस्तावातील तक्ता क मधील अ.क्र. १ ते २० मध्ये साहित्याचे नांव, संख्या, अंदाज दर प्रती नग रुपये व एकूण रक्कम रुपये नमूद केले असून याकामी र.रु. ३७,७९,३८५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या विविध खात्याकरिता संगणक व इतर अनुषंगिक साहित्य खरेदी मा. केंद्र शासनाच्या e-Marketplace (Gem Portal) वरुन खरेदी करणेस येणा-या र.रु. ३७,७९३८५/- खर्चास, Gem Portal वर साहित्याचे स्पेसिफिकेशन व दर सतत बदलत असल्या कारणाने योग्य त्या स्पेसिफिकेशन व दराचे साहित्य उपलब्ध बजेटनुसार खरेदी करणेस, तथापि आजला मा. स्थायी समिती कार्यरत नसल्याने सदरचा प्रस्ताव मुं.प्रां.महा. अधि. ३५ अ प्रमाणे मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दिनांक २२-६-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 99 ठ. क्र. 924
दि. 31/5/18 रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
एकमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरात बुधवार दिनांक १६-५-२०१८ रोजीच्या वादळीवा-याने व मुसळधार पावसाने संपूर्ण शहराला झोडपले होते. या आहाकारात १) अ. रजाक अलीशेख शेख २) शांताराम आप्पा कांबळे दोघेही राहणार, महात्मा फुले नगर, मजरेवाडी सोलापूर यांच्या घराच्या खोल्यांवरील पत्रे, लोखंडी अँगलसहीत उडून गेले. त्यामध्ये त्यांचे घरातील जिवनावश्यक वस्तू, अन्नधान्य व संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले आहे. त्यांचा संसार उघडयावर पडला आहे. तरी त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५२ ठ. क. १२६
दि. ३१.१०.१९८ ... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. व्यंकटेश नारायण श्रीमल, राहणार दाजी पेठ सोलापूर यांना -हदयविकाराचा आजार झालेला असून, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखिची आहे. ते सध्या सोलापूर मार्कंडेय सहकारी रुग्णालय येथे औषधोपचार घेत असून, सदर आजारावर उपचार करणेसाठी जवळ जवळ दोन ते अडीच लाख रुपये इतका खर्च येणार असल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितलेले आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने ते सदर आजारावर एवढा मोठा खर्च करु शकत नाहीत. सबब त्यांना औषधोपचार/ऑपरेशनसाठी सोलापूर महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष/सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज..93 ठ. क्र.....920 दि..31/07/18 रोजी ठेवला त्यावरील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



केंद्र सरकारच्या राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाचे काम वेगाने सुरु आहे. सोलापूर ते हैद्राबाद, सोलापूर ते पुणे, सोलापूर ते विजापूर असे महामार्ग सुरु आहेत. सोलापूर शहरात बहुसंख्य तेलगू भाषिक बांधव आहेत. यातील मोठया संख्येने असलेले पद्मशाली समाजाचे कुलदैवत चिरंजीव भगवान श्री. मार्कंडेय महामुनी यांचे वंशज सोलापूरात गेल्या अनेक वर्षापासून गुण्यागोविंदाने रहात आहेत.

सोलापूरातील सोलापूर विद्यापीठाला शासनाने नुकतेच अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिले आहे. याप्रमाणे सोलापूर रेल्वे स्टेशन, सोलापूर विमानतळ, याला ग्रामदैवत सिध्देश्वर, महात्मा बसवेश्वर यांचे नामकरण करण्याचा प्रस्ताव यापूर्वी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेला आहे. त्यापध्दतीने त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

श्री. मार्कंडेय महामुनींची अगाथ गाथा सर्वदूर आहे. दिल्लीतील राष्टपती भवनात पर्णकुटीला भगवान चिरंजीव मार्कंडेय महामुनींचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी नामकरण व पर्णकुटी बांधून भगवान श्री. मार्कंडेयच्या चरणी विलीन झाले. अशा या चिरंजीव भगवान मार्कंडेय महामुनींचे सोलापूर हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गाला चिरंजीव भगवान श्री. मार्कंडेय महामुनी राष्ट्रीय महामार्ग असे नामकरण करुन सोलापूरातील पद्मशाली समाज बांधवासह संपूर्ण मार्कंडेय प्रेमींना त्यांचे आशिर्वाद मिळण्यासाठी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव वगळणेत येत आहे.

Akulc P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

चंद्रपूर महानगरपालिकेच्या तहकूब/कायमूली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. १४ ठ. क्र. १२८ दि. ३१.०१.१८ रोजी ठेवला खालील प्रो. प्रमाणे बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

७० फुटी रोडवर बसून भाजी विक्रेत्यांनी रहदारीस अडथळा आणला आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. कोठयावधी रुपये खर्च करुन सदरील भाजी विक्रेत्यांसाठी चिप्पा मार्केट या नावाने मंडईचे अद्यावत बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर मंडईत विक्रेत्यांना जागा देऊन मंडई चालू करणेत यावी व रस्त्यावर बसणा-यांस जास्तीत जास्त दंडाची आकारणी करुन कारवाई करणेस आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव

चंद्रपूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामुलो/प्रितचा सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ६..५..ठ. क्र.......१२९ दि. २१.५.१८. रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महानगरपालिकेच्या विधान सल्लागार पदावर नियुक्ती करण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस आहेत. असे असताना श्री.अरुण नागनाथ सोनटक्के यांची विधान सल्लागार पदावर तत्कालीन आयुक्तांनी महानगरपालिकेचे अधिकार वापरुन स्वतःच नियुक्त केली आहे. सदरची नियुक्ती ही बेकायदेशिर आहे. सदर नियुक्तीमुळे महानगरपालिकेच्या अधिकाराचा संकोच झाला आहे. वास्तविक पाहता अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिका व आयुक्त हे दोघेही नियुक्ती प्राधीकारी आहेत. अधिनियमाचे कलम ४०, ४५ व ५३ (१) नुसार सहा.आयुक्त व त्या समतुल्य अथवा त्यापेक्षा वरील पदांवर नियुक्ती देण्याचे अधिकार हे महानगरपालिकेचे आहे. तर त्या खालील पदांवरील नियुक्तीचे अधिकार आयुक्तांना आहेत. दोन्ही नियुक्त प्राधिकाऱ्यांनी आपापल्या अधिकार क्षेत्रात काम करणे अपेक्षीत आहे. वरील नेमणूक करुन तत्कालीन आयुक्तांनी आपल्या अधिकार क्षेत्रा बाहेर जाऊन नियुक्त केली असून त्यामुळे अधिनियमातील तरतुदींचा भंग झालेला आहे. अशा प्रकारच्या नियमबाह्य नियुक्ती कधीही मान्य करता येणार नाही. त्यामुळे श्री.सोनटक्के यांची विधान सल्लागार या पदावर बेकायदेशिरपणे झालेली नियुक्ती रद्द करणेस ही सभा मान्यता देत आहे.

त्याच बरोबर अशा प्रकारे केलेल्या बेकायदेशिर नियुक्तीची चौकशी करुन दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करणेसही मान्यता देणेत येत आहे. व बेकायदेशीर नियुक्तीची चौकशी करुन दोषी असलेल्या अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई करणेस मान्यता देणेत येत आहे. केलेल्या चौकशीचा अहवाल मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ६६ ठ. क्र. १३० दि. ३१/०५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वच प्रभागामध्ये मेंन्टेनन्सची कामे करणेकरिता वार्षिक मक्तेदाराची नियुक्ती करण्यांत येऊन त्यांचेकडूनच कामे करुन घेण्यात येतात. परंतू सदर मक्तेदार हे प्रभागातील विविध मेंन्टेनन्सची कामे घेण्यास आणि ती तातडीने पूर्ण करण्यास असमर्थता दाखवितात. त्यामुळे प्रभागातील किरकोळ कामे देखील लवकर होत नसल्याने नागरिकांच्या मोठया प्रमाणात ओरड असतो. अशा प्रकारामुळे प्रभागाच्या नगरसेवकांची कामे होत नसल्याने खूपच त्रासास सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत प्रभागातील सर्वच मेंन्टेनन्सची कामे लवकरात लवकर होण्यासाठी आणि नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविणेच्या दृष्टीने प्रभागातील मेंन्टेनन्सची कामे करणेकरिता म.न.पा.च्या नोंदणीकृत असलले कोणत्याही मक्तेदाराकडून सदरची मेंन्टेनन्सची कामे करुन घेण्यास व त्यानुसार सर्व विभागीय कार्यालयाकडे आदेश प्रसारीत होणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

for P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालि०

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ९५ ठ. क्र. 139
दि. ३१/५/९८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सोलापूर महानगरपालिकेच्या प्र.क्र. ११ येथील ओपन स्पेस असलेली जागा सर्व्हे नं. १४७/१ अंदाजे ओपन स्पेसची जागा २०,००० फूट असून शासनाच्या नियमाप्रमाणे ओपनस्पेसच्या १० टक्के प्रमाणे २००० चौ.फु.चे सार्वजनिक व्यायामशाळा बांधकाम करण्यासाठी आमदार निधी क्रिडाखाते व इतर अनुदानातुन व्यायामशाळा बांधकाम करण्यासाठी जय हनुमान बहुउद्देशीय सामाजिक संस्था, किसान नगर, अक्कलकोटरोड, सोलापूर या संस्थेस देण्यात यावी. जेणेकरुन या भागातील तरुणांना व्यायामाची व कुस्तीची आवड निर्माण होईल. तरी सदर संस्थेस सर्व्हे नं.१४७/१ उत्तर सोलापूर येथील हनुमान मंदिराशेजारील २०००चौ.फु.जागा व्यायामशाळेला देणेस ही सभा मान्यता देंत आहे.

Sd/- P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ..९८.. ठ. क्र. ...१३२ दि. ..३१/८/९८... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्रीमती कमल मलकारी माने, राहणार ४४, सरवदे नगर, मुळेगांव रोड सोलापूर यांना कॅन्सरचा आजार आहे. सदर आजाराचा खर्च त्यांच्या परिस्थितीनुसार होत नसल्याने त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. त्यांचे आजारावर उपचाराकरिता अंदाजे र.रु. १.०० लाख इतका खर्च येणार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असून त्यांना कोणीही नातेवाईक नाहीत. तरी त्यांना आपल्या महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/नियमित सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ११ ठ. क्र. १३३ दि. ३१/७/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी उजनी धरण ते सोलापूर ११० एम.एल.डी. क्षमतेची दुहेरी पाईप लाईन योजना राबविणेचे अनुषंगाने कार्यवाही ठेवणेबाबत सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठया अंतर्गत उजनी ते सोलापूर दुहेरी पाईप लाईन टाकणेचे कामाचे र.रु. ४४९.६४/- कोटीचे कामाचे प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तयार करण्यात आले आहे. सदरचे र.रु. ४४९.६४/- कोटीचे काम मा. सहसचिव, नगर विकास विभाग यांचेकडील क्रमांक अमृत-२०१८/प्र.क्र.१७३/नवि-३३, दि. ९-७-२०१८ चे पत्रानुसार सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांचेकडून करणेस व त्याअनुषंगाने सदरहू योजनेसाठी एन.टी.पी.सी. कडून र.रु. २५०/- कोटीची रक्कम काम होईल त्याप्रमाणे एन.टी.पी.सी. कडून टप्प्या टप्प्याने मिळालेनंतर सदरची रक्कम सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन कडे हस्तांतर करणेस व त्याअंतर्गत सदरचे सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गतचे पहिल्या टप्प्यातील कामा अंतर्गत र.रु. ४४९.६४ कोटीचे काम एनटीपीसी कडून मिळणारे र.रु. २५०/- कोटी व सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरशन कडून मिळणारे र.रु. २००/- कोटी असे एकूण र.रु. ४५०/- कोटीच्या तरतूदीतून करणेस तसेच सदरचे पहिल्या टप्प्याअंतर्गतचे कामाअंतर्गत उजनी येथे जॅकवेल बांधणे, पंपींग मशिनरी बसविणे, उजनी ते पाकणी ते सोरेगांव पर्यंत पाईप लाईन टाकणे योजनेच्या अनुषंगाने हायवे, रेल्वे क्रॉसिंग करणे, एनटीपीसी प्रकल्प बाधित तीन गावांसाठी पाणी पुरवठा योजना राबविणे इत्यादी कामे सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांचे मार्फत करणेस, दुस-या टप्प्यातील कामांच्या अनुषंगाने मा. शासनाकडे सुधारीत योजना सादर करणे, सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, यांचेमार्फत काम करणे व तद्‌अनुषंगिक सर्व निर्णय घेणे व पत्रव्यवहार करणेस आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांना सर्व अधिकार देणेस मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव दिनांक १६-७-२०१८ चे मा. सर्वसाधारण सभेपुढे तातडीचा विषय म्हणून निर्णयास्तव घेणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ११-७-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

तसेच याकामी वेळोवेळी करणेत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेसही मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१००८ क्र....१२४
दि.३१/७/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१००

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत खाजगी विकासक यांचे कडून मार्गदर्शक सूचना मागविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहरातील मौजे सोरेगांव येथील गट क्र. १९/१ व १९/२ येथील क्षेत्रफळ २३७१२.९५ चौ.मि. इतकेचे असून सदर ठिकाणी केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) पध्दतीने राबविणेची आहे यामध्ये PMAY अंतर्गत ज्या लोकांना घरे नाहीत अशा लोकांना विकासकामार्फत घरे विक्री करणे व जे जास्तीत जास्त घरकुले महानगरपालिकेस हौसिंग फॉर डीसहाऊसड साठी देतील त्यांचेकडून Repuest For Proposal मागविणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३०-६-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१०७ प्र.ठ. क्र...९३५ दि..२७/८/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान रस्ते विकास प्रकल्प (राज्यस्तर) सन २०१७-१८ अंतर्गत प्रकल्पामधील सोलापूर शहर हद्दीतील विविध ५ रस्ते विकसीत करणे भाग **ब** मधील **१)** एल.आर.२-इंचगिरी मठ ते मोदी आर.यु.बी. (उर्वरीत लांबी) **२)** आय .आर.११ पी. २-सुनिल नगर ते विठ्ठल नगर-बसवेश्वर नगर (उर्वरीत लांबी) **३)** एल.आर.२ ए -राजस्व नगर ते प्रताप नगर **४)** एल.आर.२ बी - नागू नारायणवाडी ते डोंणगाव रोड **५)** एल.आर.५-पोटफाडी चौक ते ऑफिसर्स क्लब याकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून सर्वात कमीचे दराने मक्तेदार मेहुल कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे वाटीघाटी अंतीचे मक्त्याच्या रक्कमेपेक्षा इस्टीमेट दर (मक्त्याची र.रु.१६,७१,५४,७९७.००) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे या कामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार मेहुल कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी वाटाघाटी अंती दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा इस्टीमेट दराने काम करुन घेणेस, येणा-या खर्चास, करारपत्र करुन वर्क ऑर्डर देणेकामी मुं.प्रा.महा.अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मा. स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करणेकामी माननियांकडे निवेदन सादर केले असता मा. आयुक्त यांनी आज रोजी मा. स्था.स.चे कार्य सुरु नसल्याने एमएमसी ॲक्ट ३५ (अ) अंतर्गत मा.आयुक्त यांचे दि.१३-०७-२०१८ टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर महत्वाकांक्षी प्रकल्प लवकर पूर्ण आवश्यक असून, डांबराचे अस्थिर बाजारभावाचा परिणाम होऊ नये, यादृष्टीने डांबर दरातील फरकाबाबत प्रचलित शासनाचे निर्देशानुसार कार्यवाही ठेवणेत यावी.

Sd/- P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१०२ठ क्र....१३६ दि.३१/०७/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान रस्ते विकास प्रकल्प (राज्यस्तर) सन २०१७-१८ अंतर्गत प्रकल्पामधील सोलापूर शहर हद्दीतील विविध ७ रस्ते विकसीत करणे भाग **अ** मधील **१)** आय.आर.५-सात रस्ता ते रुपाभवानी (उर्वरीत लांबी) **२)** ई.आर.२-विद्या नगर ते दहिटणे (उर्वरीत लांबी) **३)** एल.आर.१० -महालक्ष्मी मंदिर ते राठी टेक्सटाईल (उर्वरीत लांबी) **४)** आय.आर.६- मित्र नगर ते शेळगी ते दहिटणे (उर्वरीत लांबी) **५)** एल.आर.४-२५६ गाळा ते गोंधळे वस्ती (उर्वरीत लांबी) **६)** आय.आर.१५- न्यु पुना नाका ते सायन्स सेंटर **७)** आय.आर.१३-मुरारजी पेठ जैन मंदीर ते आईस फॅक्टरी ते हिरज रोड ते खमितकर कॉम्प्लेक्स कामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून सर्वात कमीचे दराने मक्तेदार एस.एम.आवताडे कंपनी प्रा.लि. यांचे वाटीघाटी अंतीचे मक्त्याच्या रक्कमेपेक्षा इस्टीमेट दर (मक्त्याची र.रु.१२,६३,७७,५२८.००) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे या कामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार एस.एम.आवताडे कंपनी प्रा.लि. यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी वाटाघाटी अंती दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा इस्टीमेट दराने काम करुन घेणेस, येणा-या खर्चास, करारपत्र करुन वर्क ऑर्डर देणेकामी मुं.प्रा.महा.अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मा. स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करणेकामी माननियांकडे निवेदन सादर केले असता मा. आयुक्त यांनी आज रोजी मा. स्था.स.चे कार्य सुरु नसल्याने एमएमसी ॲक्ट ३५ (अ) अंतर्गत मा.आयुक्त यांचे दि.१३-०७-२०१८ टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर महत्वाकांक्षी प्रकल्प लवकर पूर्ण आवश्यक असून, डांबराचे अस्थिर बाजारभावाचा परिणाम होऊ नये, यादृष्टीने डांबर दरातील फरकाबाबत प्रचलित शासनाचे निर्देशानुसार कार्यवाही ठेवणेत यावी.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र १०३ ठ. क्र. ...१३४
दि. २१/११/१८ ....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान रस्ते विकास प्रकल्प (राज्यस्तर) सन
२०१७-१८ अंतर्गत आय.आर. -०९ - वीर सावरकर चौक ते सात रस्ता चौक रस्ता करणेकामी ई-
निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन, मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून,
सर्वात कमीचे दराने मक्तेदार एस.एम. आवताडे कंपनी प्रा. लि. यांचे निविदेत दिलेले मक्त्याच्या
रक्कमेपेक्षा १६ % कमी हे दर (मक्त्याची र.रु. ३,४९,०९,६१२/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे
याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार एस.एम.आवताडे कंपनी प्रा. लि. यांचेकडून विषयांकित
कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १६ टक्के कमी दराने काम करुन घेणेस,
येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क)
नुसार मा. स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करणेस्तव माननियांकडे प्रस्ताव सादर केले असता
मा. आयुक्त यांनी सध्या मा. स्था. स. अध्यक्षपदाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात केस सुरु आहे.
शासनाकडील निधी वेळेत खर्च करणे बंधनकारक असल्याने एमएमसी ॲक्ट क्र. ३५ (अ) प्रमाणे
मा. आयुक्त यांचे दि. ३०-६-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर महत्वाकांक्षी प्रकल्प लवकर पूर्ण आवश्यक असून, डांबराचे अस्थिर बाजारभावाचा
परिणाम होऊ नये, यादृष्टीने डांबर दरातील फरकाबाबत प्रचलित शासनाचे निर्देशानुसार कार्यवाही
ठेवणेत यावी.

(signature) P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ १०६ ठ. क्र. १३८
दि. ३१।१०।१८ ...रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ८ हा मध्यवर्ती ठिकाणी असलेला शहरी गावठाण भाग आहे. याठिकाणी मोठया प्रमाणात बाजारपेठ व व्यापारी वर्ग तसेच रहिवाशी असलेला भाग आहे. गेल्या ७५ वर्षापासून या भागात बॉईस मॅटर्निटी होम या नावाने हॉस्पिटल कार्यरत आहे. सदरचे हॉस्पिटल म्हणजे प्रसुतिगृह अत्यंत प्रसिध्द अशी हॉस्पिटल आहे. सदर बॉईस मॅटर्निटी होम ही प्रसृतीगृह अत्यंत नावाजलेली व जुनी अशी नामांकित आहे. या हॉस्पिटलच्या समोरील बाजूस मनपाच्या मालकीची एक निवासस्थान असून, ती सि.स.नं. ९९२४ या क्रमांकाने मिळकत क्रमांक असून, तो परिचारिकांसाठी आरक्षित असल्याचे दिसून येत आहे. सदर निवासस्थानाची भौगोलिक क्षेत्र जवळपास पाच ते सहा हजार चौरस फूटाची जागा आहे. त्यामध्ये त्यावेळी केवळ तीन परिचारिकांसाठी निवासस्थान बांधण्यात आलेले आहे. आजला सदर निवास्थान अत्यंत जीर्ण व जुनी झालेली असल्याने ती केंव्हाही पडून, जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या धोकादायक इमारत म्हणून गणली जाते. सदर निवासस्थानमध्ये मोठया प्रमाणात जागा शिल्लक असून ती आजला वापरात नाही. वास्तविक पाहता या निवासस्थानामध्ये अंदाजे २० सेवकांकरिता निवासस्थान बांधण्याची क्षमता असलेली जागा उपलब्ध आहे. सध्या तीन निवासस्थानापैकी इतर रिकाम्या जागेत निवासस्थान बांधल्यास डॉक्टर्स, नर्स, व इतर सेवकांसाठी (ब्रदर व सिस्टर) सोयीचे होणार आहे.कारण जवळच प्रसृतिगृह व शहरातील इतर दवाखाने तसेच प्रसृतिगहे जवळ पडत असल्याने, निवासस्थान मध्यवर्ती ठिकाणी असल्याने सर्व हॉस्पिटलमधील रुग्णांना तात्काळ सेवा उपलब्ध होणार आहे ही बाब विचारात घेण्यासारखी आहे. यासाठी याठिकाणी नव्याने रचनात्मक इमारत बांधणे आजला काळाची गरज आहे.

सध्या सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखिची असल्याने विकासाची कामे करुन याठिकाणी निवासस्थान बांधणे अत्यंत जिकीरीचे होत आहे. यासाठी सदर जागा ही ग्राऊंड फ्लोअरला शॉपिंग सेंटर इतर ऑफिसेस, तर इतर मजल्यावर निवासस्थानाची सोय करणे शक्य असल्याने, सदरची बांधकामाची कार्यवाही जाहिर प्रसिध्दीकरणाने विकसितकर्ताकडून निविदा मागवून बांधा-वापरा व हस्तांतर करा या तत्वावर बांधून घेणे संयुक्तिक ठरणार आहे. यामुळे सेवकांची निवासस्थानाची सोय होऊन पर्यायाने मनपाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये कायम स्वरुपी वाढ होणार आहे. त्यामुळे सदर बाब ही मनपाच्यादृष्टीने फायदेशीर अशी आहे. तसेच कराराची कालावधी संपल्यानंतर सदरची इमारत करारानुसार मनपाच्या ताब्यात येत असल्याने भविष्यात त्याची संपूर्ण मालकी हक्क मनपाची राहणार आहे.

तरी सदरची जागा ही बीओटी तत्वावर वरील प्रयोजनासाठी विकसित करणेकामी मा. शासनाच्या नियमानुसार योग्य त्या कालावधीसाठी कराराने देणेकामी ही सभा धोरणात्मक मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

योजना स्विकारणेच्या अनुषंगाने सर्व समावेशक बाबींची खात्री करुन मा. आयुक्त यांनी निर्णय घ्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासूर्ली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ३०५..ठ. क्र....२३९
दि.२९/११/१९.८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



कै. मल्लाप्पा वसप्पा उर्फ अप्पासाहेब वारद ( १७ जून १८५१ - १९ जानेवारी १९११) हे आधुनिक सोलापूरचे शिल्पकार होते असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. उण्यापुरया साठच वर्षांच्या आयुष्यात त्यांनी धार्मिक, सामाजिक, व्यापार, उद्योग, राजकीय व वास्तुकला अशा सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी करुन ठेवली. जी आजही स्फूर्तीदायक आहे. वयाच्या सतराव्या अठराव्या वर्षीच त्यांनी आपल्या कुटुंबाच्या व्यापाराची जबाबदारी घेतली. त्यानिमित्ताने प्रवास व अनेक महत्वाच्या व्यक्तींशी परिचय झाला. सतत नवे शिकण्याची अभ्यासू वृत्ती असल्याने ते अनेक विषयात पारंगत झाले व सर्व क्षेत्रात नवे, चांगले काय करता येईल याचा सतत विचार करत असत. व्यापार व्यवहारात वक्तशीरपणा, सचोटी, पारदर्शक व्यवहार करुन मोठे नाव कमावले व ३५ पेक्षा जास्त शहरात अडत दुकाने चालू केली. व्यापारातील आपल्या ज्ञानाचा फायदा इतरांना व्हावा म्हणून 'मुंबईचा व्यापार' हा ग्रंथ १८९२ मध्ये लिहून प्रकाशित केला. राणी व्हिक्टोरियाच्या चेंबर ऑफ मर्चंट्स मध्ये भारतातील १२ आघाडीच्या व्यापाऱ्यांत त्यांचा समावेश होता. जपानमध्ये याकोहामा बंदरात व्यापार सुरु करण्यासाठी सर्व तयारी केली होती. एक प्रगतीशील शेतकरी म्हणून त्यांनी असंख्य प्रयोग केले. नीळ, कापूस, शेंगदाणा ही पूर्वी होत नसलेली पिके सोलापूर परिसरात यशस्वी करुन दाखवली. ज्वारीचे उत्पादन कित्येक पटींनी वाढवले. मुंबई इलाख्यातील पहिला साखर कारखाना १९०५ मध्ये त्यांनी सुरु केला. पहिला यांत्रिक नांगर त्यांनीच वापरला. उत्तम प्रतीचे गायी, बैल व घोडे जोपासले. प्रशिक्षित पशु डॉक्टर नेमून सर्व प्रकारच्या गुरांची काळजी घेतली. स्वदेशीच्या ध्यासातून कापड गिरणी उभारण्याचे स्वप्न पाहिले व एन जी मिलच्या रुपाने प्रत्यक्षात आणले. ही मिल अखंड (२४ तास) चालणारी देशातली पहिली मिल होती. तिच्या स्थापनेपासून १५-२० वर्षे अखंड प्रयत्नातून त्यांनी ती नावारुपाला आणली. त्या काळी लोक तिला वारद मिल म्हणूनच ओळखत असत. व्यापार, उद्योग व शेतीत कमावलेली प्रचंड संपत्ती त्यांनी सोलापुरातील व देशभरातील धार्मिक,सामाजिक,राजकीय उपक्रमांसाठी मोठ्या प्रमाणावर दान केली. सरस्वती मंदिर ही पहिली मुलींची शाळा, वीरशैव वारद संस्कृत पाठशाला, वीरशैव वारद धर्म ग्रंथमाला प्रकाशन अशा संस्था त्यांनी उभ्या केल्या. रेवण सिध्देश्वर मंदिराचा जीर्णोद्धार, सिध्देश्वर मंदिराचा सभामंडप, रिपन हॉलचे बांधकाम, एन.जी.मिलचे एखाद्या राजवाड्यासारखे सुबक बांधकाम, व्यायामशाळा, आणि कळस म्हणजे इंद्रभुवन सारख्या अनोख्या सुंदर इमारतीचे निर्माण त्यांच्याकडून झाले. त्याकाळी सोलापुरात येणाऱ्या सर्व ब्रिटीश अधिकाऱ्यांचे पहिले स्वागत व निरोपसमारंभ वारद यांच्याकडून होत असे. लो.टिळक, न्या.रानडे, गोपाल कृष्ण गोखले, पंडिता रमाबाई, अक्कलकोटचे राजे, बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, सोलापूरचे जज सत्येंद्रनाथ टागोर व सर्व टागोर कुटुंबीय अशा अनेक महनीय व्यक्तींशी त्यांचा स्नेह होता व या सर्वांचे आदरातिथ्य त्यांनी सोलापुरात केले होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या सर्व उपक्रमांना त्यांनी नेहेमीच भरघोस अर्थसहाय्य केले. वीरशैव धर्मियांचे ते राष्ट्रीय पातळीवरील महत्वाचे नेते होते. अनेक वीरशैव संमेलनांचे ते आयोजक व अध्यक्ष होते. शिक्षणाबद्दलच्या तळमळीने त्यांनी अनेकांना शिक्षणासाठी व विविध व्यवसाय उद्योगासाठी सढळ हाताने मदत केली. संपूर्ण विसाव्या शतकातील सोलापूरच्या प्रगतीची पायाभरणी वारदांनी केली असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. आजही सोलापुरात त्यांच्या कार्याच्या असंख्य खुणा दिसतात. त्यांची जपणूक, सवंर्धन व पुढच्या पिढीला त्यांचे महत्व सांगणे हे आपले कर्तव्य आहे.

तरी या थोर समाजसेवकास आपल्या सोलापूर महानगरपालिकेच्या मा.महापौर कार्यालयात कै. मल्लाप्पा वसप्पा उर्फ अप्पासाहेब वारद यांचे जयंती दिन त्यांच्या तैलचित्रास पुष्पहार घालून अभिवादन करण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज १०६ ठ. क्र....... १४०
दि. ३१।०७।१८ ....रोजी ठेवला असता सदरचा ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी व ज्यांनी आत्महत्या केली, त्यांच्या कुटूंबीयास आर्थिक मदत करण्याच्या हेतूने अनेक शेतकरी कन्यांचे विवाह लावून देणे व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुंटूबास पुन्हा ऊभारण्यासाठी भक्कम अशी आर्थिक मदत करण्याचे काम करणाऱ्या नाम फाऊंडेशनच्या श्री. नाना पाटेकर व श्री. मकरंद अनासपूरे या रिअललाईफ हिरोंना तसेच वृक्षारोपणाची चळवळ संपूर्ण महाराष्ट्रात राबवून संपूर्ण महाराष्ट्रात हरितक्रांती करण्याचा विडा उचललेले अभिनेते श्री.सयाजी शिंदे व शहीदांच्या कंटूंबियांना, सैनिकांच्या कुटूंबियांना व शेतकऱ्यांना स्वतःच्या उत्पन्नातून शेकडो कोटींची आर्थिक मदत देणाऱ्या दानशूर अभिनेता श्री. अक्षयकुमार (राजीव भाटीया) या सर्व समाजरत्न म्हणून शोभणाऱ्या कलावंताचे सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने मानपत्र देऊन, यथोचित गौरव करणेस, सत्कार करण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज ९०७ ठ. क्र. ........ ९८९ दि. २९।५।९८ .... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र.२१ मधील अमन हॉटेल ते अपना नगर या मार्गास स्वातंत्र्य सेनानी मौलाना मोहमद अली जोहर हे नाव देण्यास याकामी येणा-या खर्चास व नामफलक लावण्यास ही सभा मान्यता देत आहे.ब्रिटीश काळामध्ये सन १९४२ साली पुकारण्यांत आलेल्या असहकार चळवळीमध्ये तसेच भारत छोडो या अंदोलनामध्ये परमपुज्य महात्मा गांधी यांचेसोबत त्यांनी अत्यंत महत्वाची भुमिका बजाविलेली आहे.मा. सर्व साधारण सभेची मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१०६..ठ. क्र.....१४२
दि. ३१/१०/९८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१०८

सोलापूर शहरातील दलित मित्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार प्राप्त व्यक्ती व संस्था प्रतिनिधींचा तसेच शहरातील गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा (राज्यपाल पुस्कृत) व्यक्तींचा सोलापूर महानगपालिकेच्या वतीने सत्कार करण्यास मान्यता देणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. १०६ ठ. क्र. १८३
दि. ३१/७/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ३ क हा कामगार व मागासलेला वसाहत आहे. याठिकाणी कोणत्याही प्रकारची सुविधा नाही. अद्याप त्याठिकाणी पक्की घरे नसल्याने विटमाती व पत्र्याची घरे आहेत. ७८६ झोपडपट्टी ही गेल्या अनेक वर्षापासून वसलेली वसाहत आहे. यामध्ये सौ. रुबीना मकबुल शेख यांचे घर असून ते पत्र्याचे आहे. दिनांक आठ दिवसापूर्वी म्हणजे ३१-६-२०१८ रोजी मोठया प्रमाणात वादळी वा-याने पाऊस झाल्याने त्यांचे राहते घर पडून उध्वस्त झालेले आहे. त्यांचे संसार उघडयावर पडलेले आहे. घरातील धान्य व संसारोपयोगी साहित्य खराब होऊ नाश झालेल्या आहेत. अंदाजे र.रु. १५ ते २० हजार इतका नुकसान झालेला आहे. सौ. रुबीना शेख या घरातील एकमेव कमावत्या व्यक्ती असून, त्यांच्यावरच घराचा आर्थिक भार आहे. ते मिळेल ते काम करुन उर्पाजीवका भागवित आहेत. त्यांचे आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखिची असल्याने त्यांच्यावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्यावर वित्त हानी झालेली असल्याने त्यांना मनपाकडून आर्थिक मदत देणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. तरी सौ. रुबीना मकबुल शेख, रा. ७८६ झोपडपट्टी, भवानीपेठ, सोलापूर यांचेवरआकस्मिक वित्तहानीमुळे त्यांची अपरिमित अशी हानी झालेली असून, त्यांना माणूसकीच्यादृष्टीकोनातून सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने जास्तीतजास्त आर्थिक अनुदान देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/विशेष
एवं साधारण सभेच्या [illegible] ११.०८. क्र. ....९४४
दि. ३१.०१.१८ ....रोजी ठराव खालील प्रो. ठराव
एकमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २ हा रविवारपेठ या परिसरात मोडत आहे. या प्रभागातील रहिवाशी श्री. संदीप सिद्राम भोसले राहणार घ.नं. २५४/८ अ रविवारपेठ, विठ्ठलपेठ हैद्राबाद रोड सोलापूर, यांच्या राहत्या घरी अचानक शॉर्ट सर्किटने आग लागून घराचे मोठया प्रमाणात व घरगुती सामानाची हानी झालेली आहे. यामध्ये आतोनात आर्थिक नुकसान झालेले आहे. संसोरोपयोगी साहित्याची मोठया प्रमाणात नुकसान झालेले असल्याने त्यांचे कुटुंब आजला रस्त्यावर आलेले आहे. श्री. संदिप सिद्राम भोसले हे खाजगीमध्ये काम करीत असून, त्यांनी मिळेल त्या तुटपुंज्या पगारवर संसाराचा गाडा चालवत आहेत. अचानक अशा दुर्दैवी काळाच्या आघातामुळे त्यांची मोठया प्रमाणात वित्त हानी झालेली आहे. यामुळे कौटुंबिक व्यवस्था पार बिघडून गेलेली आहे. याबाबत पोलिसांकडून चौकशी होऊन पंचनामा केलेला असून, तो सोबत जोडलेला असून, सोमनपाचे अग्निशामन दलाचे पत्रही सोबत जोडले आहे. श्री. संदीप सिद्राम भोसले यांच्यावर कोसळलेल्या या आकस्मिक वित्तहानीमुळे त्यांची अपरिमित अशी हानी झालेली असून, त्यांना माणूसकीच्यादृष्टीकोनातून सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने जास्तीतजास्त आर्थिक अनुदान देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

Sd/- P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/खास सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. अ१११ ठ. क्र. १८५ दि. ३१.१०.१९९८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. आरीफ फजले रहमान माशाळकर रा.१७३, बेगम पेठ, सोलापूर यांना हृदय विकार झालेला आहे. सध्या त्यांचे औषधोपचार चालु आहे. त्यांना डॉक्टरांनी एंजियोग्राफी व पुढील औषधोपचार करणेस सांगितलेले आहे. श्री. माशाळकर यांची परिस्थिती अत्यंत हालाकीची असुन त्यांचेकडे पुढील औषधोपचारा खर्च करण्याची ऐपत नाही. तरी त्यांना महानगरपालिकेच्यावतीने वैद्यकीय सहाय्यता निधीतुन जास्तीत जास्त मदत देण्यास मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ११२ ठ. क्र. ...२८६
दि. २७/७/१८ ...रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड ही अवघ्या सहा मशिन्स आणि पाच कामगारावर सुरुवात झालेली कंपनी आज जगभरातील सहा कंपन्यांची मालकी घेण्याइतकी मोठी झाली. चीनमध्ये २०१३ आणि २०१६ साली अनुक्रमे दोन प्लांट सुरु केले. गेल्या वर्षभरात चिंचोळी येथील मशिन शॉपचे विस्तारिकरण, शिवाय नाशिक मधील मेम्को इंजिनिअरिंग कंपनी, जर्मनीतील एम एफ टी कंपनी आणि नेदरलँड मधील इमॉस कंपनी अशा जगातील तीन नामवंत कंपन्या विकत घेतल्या. ब्राझील येथेही पीसीएल ऑटोमोटिव्ह लिमिटेड ही स्वतंत्र कंपनी सुरु होण्याच्या मार्गावर आहे. यामुळे सोलापूरची कंपनी खऱ्या अर्थाने विश्वव्यापी करण्यातून यतीन शहा यांनी आपले औद्योगिक नेतृत्व सिध्द केले आहे. त्याच बरोबरीने प्रिसिजन फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेक सामाजिक कामे चालतात. गेल्या दोन वर्षात जिल्हा परिषदेच्या ८० शाळा, मनपाच्या १० शाळा आणि काही खाजगी अशा १०१ शाळांना ई-लर्निंग किट देऊन डिजिटलाईज केल्या. शिवाय सोलार पॅनल बसवून त्या स्वयंपूर्णही केल्या. शेटफळ येथील व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस या संस्थेला २० लाख रुपये खर्चून इमारत बांधून दिली. सोलापुरातील सिव्हिल हॉस्पिटल मध्ये १४.५० लाख खर्चून बेरा टेस्टींग मशिन दिली. आता सध्या सिव्हिल मध्येच 'ए' ब्लॉकमध्ये अत्याधूनिक डायलेसीस यूनिट सुरु केले जात आहे. त्यासाठी प्रिसिजनने १८ लाख रुपये खर्चून वॉर्ड अत्याआधूनिक केला. शिवाय १३ लाख रुपये खर्चून २ डायलेसीस मशिन दिले आहेत. डॉ.सुहासिनी शहा यांच्या सामाजिक दृष्टीची ही एक झलक आहे. या शिवाय प्रिसिजन गप्पा , प्रिसिजन संगीत महोत्सव आणि सोलापूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून सोलापूरला नवी सांस्कृतिक ओळख दिली. सोलापूरच्या औद्योगीक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा तिन्ही पातळीवरील विकासात यतीन शहा आणि डॉ.सुहासिनी शहा यांचे योगदान मोठे आहे. प्रिसिजन उद्योग समुहाने जर्मनीमध्ये नवा प्रोजेक्ट सुरु केल्या नंतर तेथील महापौरांनी शहा दांम्पत्याचे कौतुक केले असून जर्मनीतल्या माध्यमातून प्रिसिजनचे मोठे कौतुक करण्यात आले आहे. यतीन शहा व डॉ. सुहासिनी शहा हे सोलापूरचे असल्याने जगभर त्यांचे कौतुक होत आहे. अशा या सोलापूरच्या भूमीपूत्रांना सोलापूर महानगरपालिकेकडून मानपत्र देणेस आणि त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ११३ ठ. क्र.......९८७
दि. २९.७.१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते मान्य झाला.



सोलापूर महानगरपालिकेतील विविध खात्यातील सर्व सेवकांचे वेतन परिपत्रकात नमूद तारखेला करणेविषयी कळविणेत आलेले आहे. यामध्ये परिपत्रकात नमूदप्रमाणे बायोमॅट्रीक ॲटेन्डन्स सिस्टीम प्रणालीनुसार तक्ते सादर करणेची कार्यवाही ठेवण्यात यावी असे नमूद आहे.

परंतु नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांना बायोमॅट्रीक अटेन्डन्स सिस्टीम प्रणालीप्रमाणे कार्यवाही ठेवणे ही बाब कार्यालयीन कामकाजाच्यादृष्टीने अत्यंत जिकीरीची होत आहे. नगरसचिव खात्यामध्ये पदाधिकारी यांचे कार्यालय मोठया प्रमाणात आहेत. नगरसचिव कार्यालयातील व पदाधिकारी यांचे कार्यालयातील सेवकांना पदाधिकारी व सदस्यांचे निगडीत असलेली कामे दररोज करावी लागतात. तसेच नगरसचिव कार्यालयाकडील मा. सर्वसाधारण सभा, मा. स्थायी समिती सभा, मा. परिवहन समिती सभा, मा. स्थापत्य समिती, मा. महिला व बालकल्याण समिती तसेच इतर विशेष समित्यांचे कामकाज ही कालमर्यादेत कार्यालयात वेळी अवेळी थांबून काम करावे लागते. काही वेळेला पदाधिकारी यांचे सूचनेप्रमाणे संबंधित कर्मचारी वर्गाना कार्यालयाबाहेर जाऊन भेटून त्यांचे सूचनेचे पालन करावे लागते. तसेच संबंधित सेवक कार्यालयात येत असताना मध्येच मोबाईल वरुन पदाधिकारी यांचे सूचना वजा आदेश येत असतात. त्यामुळे त्या सूचना व आदेशाचे पालन करण्यासाठी मा.पदाधिकारी जेथे असतील तेथे जाऊन त्या बाबींची पूर्तता करुन कार्यालयात यावे लागते. काहीवेळेला कार्यालयीन कामकाजासाठी प्रिंटींग प्रेसमध्ये अजेंडा छापणे, लेटरपॅड छपाई करणे इत्यादीसाठी ये जा करावे लागते. वेळेत काम होणेसाठी मा. पदाधिकारी व नगरसेवक यांचा तगादा असतो. तसेच बाहेरील वाटप शिपाई यांना अजेंडा, इतिवृत्तांत, विनंती पत्रके, निमंत्रण पत्रिका, इत्यादी वाटप कामे कालमर्यादेत करावी लागतात. त्यामुळे सहसा त्यांचे जास्त काम हे कार्यालयीन वेळनंतरच असतो. अशावेळी सर्वांना कार्यालयात येण्यास उशिर होतो. त्यावेळी कर्मचारी वर्गांना थंब इम्प्रेशनसाठी (हजेरीसाठी) कार्यालयात येण्यासाठी ओढाताण होत असते. काही वेळेला इंटरनेट सेवा बंद पडत असल्याने उशिरा थंब करण्यात येत असते. तसेच नगरसचिव कार्यालयाकडील वाहन चालक यांची पदाधिकारी यांचे वापरातील वाहनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रत्येक पदाधिकारी यांचे वाहनावर सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० व दुपारी ४.०० ते रात्रो १२.०० वाजेपर्यंत येऊन दोन सत्रामध्ये दोन वाहन चालकांना काम करावे लागते. कधी कधी अत्यावश्यक सेवेशी निगडीत असलेल्या ठिकाणी सकाळी ५.०० किंवा ६.०० वाजता बोलाविण्यात येत असते. तसेच काहीवेळेला रात्री अपरात्री पर्यत मिटिंग व पार्टी मिटिंग असतात त्यावेळेला त्यांना उपस्थित रहावे लागते. तसेच काही वेळेला अर्जंट कामासाठी आहे त्या परिस्थितीत परगावी जावे लागते. काही वेळेला घरी तर काहीवेळेला प्रभागात उद्‌घाटन व विकास कामासाठी जावे व थांबावे लागते.

मा. पदाधिकारी यांचे दररोज कार्यालयातील उपस्थिती व कार्यालयीन वेळेनंतर बैठका, चर्चासत्रे, तसेच प्रेसनोट कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी येऊन पदाधिकारी यांचे सूचनेप्रमाणे जादावेळ थांबून सर्व कामे करणे, तसेच मान्यवर व्यक्तींच्या पुण्यतिथी व जयंतीकरीता अभिवादन करणेसाठी सर्व व्यवस्था करणे इत्यादी कामे विना विलंब करावी लागतात. तसेच जिल्हा नियोजन विकास कामासाठी तसेच मा. पदाधिकारी यांचे निवडणूक कामाविषयी मा. जिल्हाधिकारी कार्यालयात ये जा करावे लागते. त्यासाठी संबंधित सेवक येऊन मा. जिल्हाधिकारी कार्यालयात थांबून काम करीत असतात. त्यामुळे संबंधित कार्यालयातील सेवक व ड्रायव्हर हे दररोज कार्यालयीन वेळेनंतर थांबून अशा प्रकारची सर्व कामे करीत असतात. अशावेळी बायोमॅट्रीक अटेन्डन्स सिस्टीम प्रणालीप्रमाणे काम करणे अत्यंत जिकीरीचे होत आहे. काही सेवकांना त्यांच्या कामानुसार उशिरा येऊन थंब इम्प्रेशन करावे लागते ही बाब सत्य व खरी आहे.

परंतु उपरोक्त परिपत्रकानुसार सर्व सेवकांना वेळेवर थंब इंप्रेशन करणे बंधनकारक असल्यामुळे या कार्यालयाकडील सेवकांना यामध्ये सवलत देणे या कार्यालयाकडील कामाच्या स्वरुपानुसार इष्ट होईल. उपरोक्त सर्व बाबींचा साकल्याने विचार करता, थंब इम्प्रेशनसाठी या कार्यालयातील सेवकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८(अ) अन्वये नगरसचिव कार्यालय हे मा. स्थायी समिती व मा. महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली येत असल्याने या अधिकाराचा वापर करुन नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांना थंब इंप्रेशनमध्ये सवलत देणेस ही सभा धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

[illegible] दररोज करावी

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.११६..ठ. क्र.......१४८ दि..३१/०१/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



डोंगर कपारीत व रानोमाळ भटकणा-या बंजारा समाजाला आधुनिक जगाची ओळख करुन देणारे हरित क्रांतीचे प्रणेते व सतत ११ वर्ष महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविलेले स्व. वसंतराव नाईक साहेब यांचा विजापूर रोड येथील नेहरु नगर येथे पूर्णाकृती पुतळा उभा आहे. हा पुतळा नेहमी त्यांच्या कार्याचे स्मरण करुन देणारा असा असून, सर्व जातीधर्मासाठी प्रेरणादायी असा आहे. परंतु हा पुतळा सध्या दुर्लक्षित आहे. या पुतळयाची आजला दुरावस्था झालेली आहे. यासाठी पुतळयास नव्याने रंगरंगोटी करणेची आवश्यकता आहे. त्याचबरोबर या पुतळयाची उंची लक्षात घेता, पुण्यतिथी व जयंती साजरी करताना पुतळयास अभिवादन व पुष्पगुच्छ अर्पण करताना अडचणीचे होत असल्याने यासाठी कायम स्वरुपी शिडी ठेवणे योग्य होणार आहे.

तरी सदर पुतळयाची आवश्यक ती डागडुजी करुन, नव्याने रंगरंगोटी करणेस व पुष्पहार घालणेकामी कायम स्वरुपी शिडीची व्यवस्था करणेकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

तरी याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुलो/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ११५ ठ. क्र. ९४१ दि. ३१/८/१८ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. बाबासाहेब प्रल्हाद माने, शिपाई, नवी मुंबई महानगरपालिका, यांचे सोलापूर शहर महानगरपालिका येथे बदलीने सेवा वर्ग करणेबाबत विनंती अर्जात नमूद केले आहे की, श्री. बाबासाहेब प्रल्हाद माने, हे नवी मुंबई महानगरपालिकेत दि. १९-८-२०13 पासून शिपाई या पदावर मा. अतिरिक्त आयुक्त (शहर) यांचे अधिपत्याखालील परिमंडळ-१ येथे कार्यरत असून ३ वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे. त्यांच्या कुटूंबात त्यांची पत्नी, दोन मुले व वडील आहेत. त्यांची पत्नी पोलीस मुख्यालय, सोलापूर शहर येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत आहे. श्री. बाबासाहेब माने हे सद्यस्थितीत नवी मुंबई शहरातच भाडेतत्वावर खोली घेऊन एकटे राहत आहे. त्यांची पत्नी व दोन मुले व वडील सोलापूरमध्ये राहत असून मुलांच्या शिक्षणासाठी सोलापूरमध्ये राहत आहेत. नुकतेच त्यांच्या आईचे कॅन्सर या आजाराने निधन झाले आहे. तसेच पती-पत्नी एकत्रीकरण अभावी कौटुंबिक वातावरण व मानसिक स्थिती बिघडली असून ते सद्यस्थितीत सतत तणावाखाली काम करत आहेत. तरी शासनाचे पती-पत्नी एकत्रिकरणासंबंधीचे धोरण व मानवतावादी दृष्टीने व सहानुभूतीपूर्वक विचार करुन नवी मुंबई महानगरपालिकेतून सोलापूर शहर महानगरपालिकेत शिपाई या पदावर श्री. बाबासाहेब प्रल्हाद माने यांची कायमस्वरुपी बदलीने सेवा वर्ग करणेस मा. आयुक्त सों.म.पा. यांनी मान्यता दिली असून सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव नामंजूर करणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका